जनसंपर्क कक्ष
2 4 AUG 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्हा प्रशासन-विद्यापीठ एमओयू

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

जिल्हा प्रशासनाला तांत्रिक मदत करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने हात पुढे केला असून गतीमान प्रशासनासाठी शिवाजी विद्यापीठ व जिल्हा प्रशासनामध्ये सामंजस्याचा करार झाला आहे. या करारानुसार जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांना ई लर्निंगचे प्रशिक्षण देणे व जमिनीचे गुगल मॅपिंगसाठी विद्यापीठ मदत करणार आहे.

जिल्हा प्रशासनाला नाविन्यपूर्ण योजना राबवताना अनेकवेळा तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, महानगरपालिकेसह सरकारी कार्यालयात ४० वर्षाहून अधिक वयाच्या कर्मचारी तांत्रिक शिक्षण घेण्यास उत्सुक नसतात. अशा कर्मचाऱ्यांना तांत्रिक सहाय्य देण्यासाठी बाहेरच्या संस्थांच्यावर अवलंबून रहावे लागते. त्यासाठी प्रशासनाला जादा खर्चाची तरतूद करावी लागते. या समस्येवर जिल्हा प्रशासनाने उत्तर शोधले असून शिवाजी विद्यापीठाची मदत घेण्यासाठी दोन महिन्यापूर्वी प्रशासनाने संपर्क साधला होता.



**शिवाजी विद्यापीठ व जिल्हा प्रशासनात सामंजस्यांचा करार झाला आहे. नाविन्यपूर्ण योजनांसाठी शिवाजी विद्यापीठाची तांत्रिक मदत होणार आहे. या सामंजस्याच्या करारामुळे प्रशासन वेगवान होण्यास मदत होणार आहे.**

**- संजय शिंदे,**
**निवासी उप जिल्हाधिकारी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांच्यात बैठक होऊन सामंजस्यांचा करार करण्याचा निर्णय घेण्यात आला. विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी या कराराला हिरवा कंदील दाखवला. गेल्या आठवड्यात शिवाजी विद्यापीठात कुलगुरु शिंदे व विभागीय आयुक्त दळवी यांनी सामंजस्य करारावर सह्या केल्या. त्यानुसार विद्यापीठाने तांत्रिक सहाय्य देण्याची तयारी दर्शवली आहे. शिवाजी विद्यापीठातील सर्व विभाग व विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व इंजिनिअरिंग, मेडिकल व अन्य महाविद्यालयाची मदत घेतली जाईल. एकाद्या सरकारी कार्यालयाला नवीन योजना राबवण्यासाठी प्रकल्प तयार करायचा असेल तर त्या प्रकल्पाचा डाटा, अन्य माहिती विद्यार्थी तयार करतील.

सामंजस्याच्या करारानंतर जिल्हा परिषदकडून राबवल्या जाणाऱ्या ई लर्निंगसाठी चार हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची तयारी शिवाजी विद्यापीठाने दर्शवली आहे. दोन महिन्यात २००८ शाळांतील चार हजार शिक्षकांना ई लर्निंग प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व जमिनींचे गुगल मॅपिंग गटानुसार करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 AUG 2017
पुढारी

# शिस्तबद्ध जीवनशैली ही यशाची त्रिसूत्री : डॉ. बागी

कोल्हापूर : जीवनात यशस्वी होण्यासाठी उत्तम आरोग्य, शिस्तबद्ध जीवनशैली, स्वयंशिस्त अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी केले. यश हे आपोआप मिळत नाही तर ते ज्ञान संपादन व इतर कौशल्ये यांच्या आधारावर मिळवता येत असल्याचेही त्यांनी सांगितले. बी. टेक. प्रथम वर्षाच्या तंत्रज्ञान अधिविभाग विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. बागी बोलत होते. समन्वयक प्रा. एच.पी. साळुंखे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. एन. जे. कोतमिरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. व्ही.के. चोपदार तर आभार प्रा. आर. बी. रणपिसे यांनी मानले. यावेळी विद्यार्थी व प्राध्यापकांनी वसतिगृहाच्या प्रांगणात वृक्षारोपण केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 AUG 2017
पुण्यनगरी

# किरण गुरव यांना महानोर पुरस्कार

कोल्हापूर / प्रतिनिधी :



साहित्यिक किरण अनंत गुरव यांना जळगाव येथील भंवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनचा सन २०१६-१७ चा ना. धों. महानोर सर्वोत्कृष्ट गद्यलेखन पुरस्कार जाहीर झाला आहे. सन्मानचिन्ह, गौरवपत्र आणि रोख ५१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप असून, येत्या ६ सप्टेंबर रोजी जळगावच्या जैन हिल्स येथील कस्तुरबा सभागृहात पुरस्कार वितरण होणार आहे.

गुरव यांचे 'राखीव सावल्यांचा खेळ' आणि 'श्रीलिपी' हे दोन कथासंग्रह प्रकाशित असून त्यांच्या अनेक कथा विविध साहित्यिक नियतकालिके तसेच दीपावली विशेषांकातून प्रकाशित झाल्या आहेत. शिवाजी विद्यापीठात अधीक्षकपदी कार्यरत असलेल्या गुरव यांचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स



ऋणातून उतराई कशी करायची असते, याचे मूर्तिमंत उदाहरण महाराष्ट्र टाइम्सने घालून दिले आहे. वाचकांप्रती असलेले नाते जपताना विकासाला कशी चालनी मिळेल याची पुरेपूर काळजी घेतली असल्याचे मटा कॉन्क्लेव कार्यक्रमातून स्पष्ट होते. विकासाभिमुख घेतलेली भूमिका भविष्यात एक मैलाचा दगड ठरणार आहे. विकासाच्या मांडलेल्या १३ मागण्या या भविष्यातील कोल्हापुरातील विकासाचा मापदंड ठरवणाऱ्या आहेत.

**- महेश काकडे,** परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

## गौतम पाटील यांची निवड

**सांगली :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या क्रीडा आणि शारीरिक शिक्षण मंडळाच्या सदस्यपदी महाराष्ट्र राज्य जिम्नॅस्टिक असोसिएशनचे अध्यक्ष, नवभारत शिक्षण मंडळाचे संचालक गौतम पाटील यांची निवड झाली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ही निवड जाहीर केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळासाठी नवीन नियमानुसार समितीचे अध्यक्षपद कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे आले आहे. शिव छत्रपती पुरस्काराचे मानकरी संभाजी पाटील, अर्जुन पुरस्कारप्राप्त शैलेजा साळुंखे यांची सदस्य म्हणून तर संस्था प्रतिनिधी म्हणून गौतम पाटील यांची निवड करण्यात आली.